INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

January-February-March-2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 9, Issue-1

## Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

ERROR: undefined
OFFENDING COMMAND: s*t
STACK: --dict-- , --savelevel-- ,


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | The Struggle for Power in Pinter's 'The Caretaker' | Dr A. K. Singh | 05 |
| 2 | The Study of Identity Crisis in 'The God of Small Things' | Smt. Sarala Sanap | 09 |
| 3 | Ecological Awareness in Select Poems of A. K. Ramanujan: an Ecocritical Reading | Dr. Anil Aher | 14 |
| 4 | A Critical Study of Cyberspace and Cybernetics in William Gibson's Novel 'Monalisa Over Drive' | Dr. Umaji Patil | 18 |
| 5 | A Postmodernist Reading of the 'Inheritance of Loss' by Kiran Desai | Dr. Sandeep Sanap | 22 |
| 6 | A Novel Study on the Evaluation Mechanism in Current Educational System of India | Dr. Nagin Patel | 26 |
| 7 | A Study of Change Proneness and Stress of Organic and Conventional Farmers of Pune District( N/ 300) | Deepa D. Naik | 32 |
| 8 | 'Matsyagandha' to the Development of the Lives of Marine Fishermen in the Coastal Areas of Maharashtra | Mr. Valmik Wagh, Dr. Abhay Shende | 38 |
| 9 | Socio-Economic Status of Kaikadi Community in Maharashtra | Shubhangi Sutar | 43 |
| 10 | Dr. Babasaheb Ambedkar : Pioneer of Social Welfare in India | Dr. Manish Sonawane | 53 |
| 11 | Is Mobile Based Applications A Possible Soulution to Tackle the Mental Health Challenges Among Uniformed Forces: A Scoping Review | Dr. Vinod Gajghate | 60 |
| 12 | Achievement Through ERAC Technique: A Pilot Study | Jayashri Patil, Dr. Santosh Khirade | 66 |
| 13 | A Study of the Disaster Management in Ratnagiri District College Libraries | Dr. Rajesh Rajam | 71 |
| 14 | Future of Academic Libraries' Sustainability in Changing Information World | Dr. Neha M. Joshi | 78 |
| 15 | Library and Information Science Education in Maharashtra Universities | Prof. Shubham Patil, Dr. Manisha Dhangal | 84 |
| 16 | A Correlational Study of Suicidal Thoughts Among Undergraduate Students of Arts and Science Field | Ashwini Jadhav | 90 |
| 17 | A Study of Attitude Towards Research Among the Teachers at Secondary Level | Jayashri Patil, Dr. Santosh Khirade | 95 |
| 18 | Poverty In India | Dr. Mahendra Agale | 102 |
| 19 | A Study of Psychological Well-Being and Environmental Attitude Between Organic and Conventional Farmers of Pune District (N/300) | Deepa Naik | 107 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 20 | फोर्ट विलियम कॉलेज की भाषा नीति | प्रो.मोहन | 113 |
| 21 | हिंदी कहानी साहित्य में चित्रित धार्मिक एकता | डॉ. शकिला जब्बार मुल्ला | 118 |
| 22 | मुशर्रफ आलम जौकी के उपन्यासों में राजनैतिक परिवेश | प्रा. सुनिल कांबळे, डॉ.बी.डी.वाघमारे, डॉ. शंकर पजई | 121 |
| 23 | 'पोस्ट बॉक्स नं. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | शशिप्रभा शास्त्री के उपन्यासों में नारीविमर्श | डॉ. महेंद्र रघुवंशी | 141 |
| 28 | मैत्रेयी पुष्पा की आत्मकथा में स्त्री विमर्श | प्रा. मीना ठाकूर | 145 |
| 29 | मानवता के लिए संघर्षरत नारी : 'राजो' | प्रा. हसीना मालदार | 148 |
| 30 | 'पलकें सुलग रही है' कविता संग्रह में सामाजिक चेतना | श्री. सचिन कांबळे | 151 |
| 31 | अनुवाद : एक अनमोल देन | डॉ. वासुदेव शेट्टी | 154 |
| 32 | महिला सशक्तिकरण - आभास और वास्तव | श्री. संजय जाधव | 158 |
| 33 | जल, कृपी, स्वास्थ, सामाजिक जीवन, औद्योगिक क्षेत्र के विकास में पर्यावरण का प्रभाव | डॉ. मीना ठाकूर | 162 |
| | **मराठी विभाग** | | |
| 34 | आदिवासींचा होळी उत्सव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 165 |
| 35 | 'जत्रा' या कथासंग्रहातून येणारे तडवी बोली व समाज जीवन | डॉ. धनराज धनगर | 170 |
| 36 | नंदुरबार जिल्ह्यातील महार समाजाचे लोकजीवन आणि लोकसंस्कृती | प्रा. कल्पना साळवे | 175 |
| 37 | कोकणा बोली आणि मराठी भाषा | श्री. लक्ष्मण टोपले | 178 |
| 38 | गडकऱ्यांची नाट्यसृष्टी व स्त्री प्रतिमा | प्रा. यादवराव गहाणे | 185 |
| 39 | विविध प्रश्न, उपरोधिक शैलीत मांडणारा प्रयोगशील नाटककार : शफाअत खान | डॉ. रवींद्र कांबळे | 189 |
| 40 | वेदनांची अनुभूती देणारा काव्य संग्रह - 'विस्तवाचे ओझे' | प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे | 194 |
| 41 | 'मी मेलो त्याची गोष्ट' - एक वास्तवाभिमुख कादंबरी | डॉ. संगीता शेळके | 200 |
| 42 | 'काळी गंगा' कादंबरेंल्या वातावरण निर्मितीचो चिकित्सक अभ्यास | दीपराज सातर्डेकर | 203 |
| 43 | आंबेडकरवादी काव्यप्रकार | डॉ. गोविंद रावळेकर | 212 |
| 44 | डॉ. आंबेडकर यांचा शेती विषयक दृष्टिकोन | राहुल गोंगे | 217 |
| 45 | आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना | प्रा. कृष्णा पाडवी | 221 |
| 46 | रशिया-युक्रेन युद्धाचा भारतावर झालेल्या व होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | डॉ.एन.एन.गाढे | 229 |
| 47 | भारतातील लघुउद्योगांच्या समस्यांचा अभ्यास | प्रा. युवराज जाधव | 234 |
| 48 | लाखनी तालुक्यातील भात गिरणी कामगारांचा अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 241 |
| 49 | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना | प्रा. कृष्णा पाडवी | 245 |
| 50 | समाजकार्य शिक्षणाचे भारतीयकरण | डॉ. अनंत देशमुख | 250 |
| 51 | भारतातील संसदेचा उगम आणि विकास | डॉ. देविदास नरवाडे | 255 |
| 52 | महिलांचे आर्थिक सक्षमीकरण : स्वरूप व महत्त्व | डॉ. विवेक चौधरी | 260 |
| 53 | माहिती अधिकार कायदा २००५- एक कायदेशीर अधिकार | डॉ. पद्माकर दारोंडे | 264 |
| 54 | पुणे शहरातील निवडक ऐतिहासिक स्थळे : एक अभ्यास | डॉ. राजेंद्र रासकर | 269 |
| 55 | बागलाण मधील राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास | रत्नाकर सुभाष वाघ | 274 |
| 56 | सिट अप्सचा कुमार गटातील विद्यार्थ्यांच्या स्नायुंची ताकद व दमदारपणावर होणारा परिणाम | डॉ. विशाल गायकवाड | 278 |
| 57 | सूर्यनमस्कार - एक सर्वांग परिपूर्ण व्यायाम | प्रा. भाऊसाहेब थोरात | 281 |

# आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना

**प्रा. कृष्णा रावा पाडवी**
अर्थशास्त्र विभाग,
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा
ता.बागलाण जि.नाशिक.
मो.न.09922999255
Email- krishnarawapadvi5555@gmail.com
संशोधन केद्रांचे नावःके.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना :**

आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याणअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना अत्यंत महत्वाच्या आहेत. प्रामुख्याने शासकीय आश्रमशाळा आश्रमशाळा व्यवस्थापन, आश्रमशाळा (केंद्रशाळा) कन्याशाळा, कनिष्ठ महाविद्यालय केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना उदा. उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना, प्रशिक्षणाची योजना, मानवी साधनसंपत्तीच्या विकासच्या योजना आदिवासी कल्याण योजना इ.तसेच राज्यांतील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना, भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबलीकरण व स्वाभिमान योजना, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम वीजपंप/तेलपंप आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.एच.डी.पी.ई पाईपचा पुरवठा करणे इ. महत्वपूर्ण योजना सर्वागीण विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येत आहेत.

**शोधनिबंधाची उदिष्टये :**

1) आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना अभ्यासणे.
2) कल्याणअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे योगदान अभ्यासणे.

**संधोधनाची गृहितके :**

1. आदिवासी विकास विभागार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे सर्वागीण विकास साध्य होण्यास मदत होत आहे.
2. शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून तरतूद उपलब्ध करुन देण्यास प्रतिबंध आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिवंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. उदा. त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, महाराष्ट्र शासनाचे विविध परिपत्रक विविध वार्षिक अहवाले, नियतकालिके, मासिके साप्ताहिके, दैनिक वर्तमानपत्रे, विविधलेख, विविध संकेतस्थळे, आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका इ.चा संशोधनासाठी आधार घेण्यात आलेला आहेत्र.

**आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना**

**1) शासकीय आश्रमशाळा–**

अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सन 1972–73 पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे. ही योजना मुख्यत्वे करुन अतिदुर्गम,डोंगराळ व पाडयातील आदिवासी मुला/मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करुन शैक्षणिकदृष्टया त्यांना सुशिक्षित करणे व त्यायोगे जीवनमान उंचावणे या उददेशाने राबविण्यात

येते. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात, दुर्गम पाडयात पोहचविण्याचे काम शासकीय आश्रमशाळांमार्फत होत आहे. या योजनेनुसार अनुसूचित जमाती क्षेत्रात 5000ते 7000 लोकंसख्येच्या क्षेत्रात एक आश्रमशाळा हा सर्व सर्वसाधारण निकष ठरविण्यात आला आहे. काही क्षेत्रातील भाग हा अतिदुर्गम असून तेथे लोसवस्ती ही पाडयापाडयांमध्ये विखुरलेली असल्याने अशा काही ठराविक ठिकाणी 3000 ते 5000 लोकसंख्येच्या क्षेत्रास एक आश्रमशाळा हा निकष सन 1982 पासून ठरविण्यात आला आहे.

अ) आश्रमशाळा व्यवस्थापन :

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागाचे अधिनरत्त एकूण 552 शासकीय आश्रमशाळा आहेत.

| | | |
|---|---|---|
| त्यापैकी | प्राथमिक आश्रमशाळा | 128 |
| | माध्यमिक आश्रमशाळा | 424 |
| | एकूण | 552 |
| यापैकीच | इंग्रजी माध्यमाच्या पब्लीक स्कुलच्या धर्तीवर 5 | |
| इंग्रजी माध्यम | | 6 |
| एकूण इंग्रजी शाळा | | 11 |
| एकूण शाळांपैकी | | |
| केंद्र शाळा | | 148 |
| कन्याशाळा | | 26 |
| कनिष्ठ महाविद्यालय | | 126 कार्यरत आहेत. |

वरील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे शासकीय आश्रमशाळामंधून सन 2010–11 मध्ये एकूण 210244 विदयार्थी घेत आहेत. यामध्ये 110922 मुले आणि 99322 मुलींचा समावेश आहे. आश्रमशाळेतील प्रत्येक वर्गात 40 निवासी व 10 अनिवासी विद्यार्थीना प्रवेश देण्यात येतो,

ब) आश्रमशाळा (केंद्रशाळा) –

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण व दर्जा उंचावणे यासाठी शासकीय व अनुदनित आश्रमशाळांमधून शासन निर्णय क्रमांक एएससी – 1095/प्रक्र22/का 13 दिनांक 23 फेबुवारी 96 अन्वये एकूण आश्रमशाळांपैकी 144 शासकीय आश्रमशाळांची केंद्र आश्रमशाळा म्हणून निवड करण्यात आलेली आहे. एकूण 552 शासकीय आश्रमशाळा व 556 अनुदानित आश्रमशाळांची तपासणी केंद्रप्रमुख्यांमार्फत करण्यात येते.

2) कन्याशाळा –

शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थीनींच्या संदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीने काही वेळ अडचणी उदभवतात. त्यामुळे 552 शासकीय आश्रमशाळांपैकी काही आश्रमशाळांचे कन्या शाळेत रुपांतर करण्याचे शासनाने ठरविले व त्यानुसार एकूण 26 आश्रमशाळांचे कन्या शाळेत रुपांतर करण्यात आलेले आहे. या सर्व आश्रमशाळा माध्यमिक स्वरुपाच्या आहेत.

सन 2006–07 या शैक्षणिक वर्षापासून शासनाने अतिउत्तम पब्लीक स्कूलच्या धर्तीवर जिल्हाच्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात मंजुरी दिली आहे. त्यापैकी नाशिक विभागात 2 व ठाणे/अमरावती/नागपूर विभागात प्रत्येकी 1 इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत.

अ) कनिष्ठ महाविद्यालय :

आदिवासी विकास विभागाअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून ज्या शासकीय आश्रमशाळा इ.10 वी पर्यंत पोहोचलेल्या आहेत. त्या शाळांपैकी एकूण 126 ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये मंजूर केलेली आहेत. सद्यस्थितीत सदर कनिष्ठ महाविदयालय कार्यान्वित आहेत.

वरील सर्व आश्रम शाळांमध्ये विदयार्थ्यांना खालील सुविधा पुरविण्यात येतात. उदा आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच भोजन, निवास, आंथरुण, पांघरुण, गणवेष, वहया, पुस्तके, शालेय साहित्य आणि अन्य वस्तु जसे (खोबरेल तेल, आंघोळीचा साबण, कपडयाचा साबण,दंतमंजन, जेवणासाठी ताट–वाटी, ग्लास, बूट, मोज, लोखंडी पेटी, खेळ साहित्य, वूलन स्वेटर्स, कुडता, पायजमा व नाईट गाऊन) इत्यादी सुविधा मोफत पुरविण्यात येताात. अनिवासी विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था सोडून सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य, गणवेष एक वेळेचे जेवण देण्यात येत. आश्रमशाळेतील सर्वच विद्यार्थ्यासाठी खेळ साहित्य, गणवेष एक वेळेचे जेवण देण्यात येते. आश्रमशाळेतील सर्वच विद्यार्थ्यासाठी खेळ साहित्य, वाचनालयातील पुस्तके तसेच करमणुकीचे साधने (टी.व्ही,व्ही.सी. आर) देण्यात येतात.

३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट):

महाराष्ट्रात निरनिराळया क्षेत्रात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातीच्या विकासाच्या प्रगतीमध्ये ठिकठिकाणी तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती मधील विपुलता अथवा त्रुटी भिन्न असल्यामुळे ठराविक साच्याचे कार्यक्रम सर्वच प्रकल्प क्षेत्रात आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाही. आदिवासी विकास कार्यक्रमांच्या योजनांमध्ये स्थलाकालानुरुप लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी आदिवासी विकासाच्या दृष्टीने, सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजूरीचे अधिकार प्रदान करुन सदर कार्यक्रम तातडीने कार्यन्वयीत करता यावेत याउददेशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) ही योजना शासनातर्फे सन 1981–82 या वर्षापासून राबविली आहे. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) मधील योजनांमध्ये लाभार्थीना कर्ज देणे अपेक्षित नाही.

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दिर्घ कालावधीकरीता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वयीत करुन त्यांचा लाभ गरजू आदिवींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा या योजनेचा गाभा आहे. या निधीतून कार्यान्वयीत करावयाच्या योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती/कुटुंब केद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने राबविल्या जातात. या योजनेमध्ये मुलभूत सोयी किंवा पदनिर्मिती यावर निर्बंध आहेत.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना मंजूरीसाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली निर्देश समिती शासनाने गठीत केली असून त्यात संबंधित विभागाचे योजना प्रस्तावित करणारे किंवा अंमलबजावणी करणारे अधिकारी सदस्य व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सदस्य सचिव आहेत. केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) अंतर्गत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत राबवायच्या कर्जविरहीत योजना व त्यासाठी वापरावयाचा निधी यासंबंधी मार्गदर्शक सूचना व आर्थिक मर्यादेत वाढ आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो–2000/प्र.क्र.144 (अ) / का.5, दिनांक 31 मे,2001 अन्वये आर्थिक मर्यादा रुपये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून या योजनेअंतर्गत प्रत्येकी लाभार्थी आर्थिक मर्यादा रुपये 15,000/– एवढी आहे. सदर योजनेसाठी प्रामुख्याने 4 गट पाडण्यात आले आहेत.

अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना –

या स्वरुपाच्या योजनेमध्ये सर्वसाधारणपणे शेती उत्पन्न वाढविणे, लहान लहान सिंचन योजना, पी.व्ही.सी. पाईप पुरविणे, पंपदुरुस्ती, विविध विभागामार्फत उत्पन्न निर्मित असलेल्या वैयक्तीक लाभाच्या किंवा कुटुंबाच्या लाभाच्या योजनांचा समावेश होतो. सदर योजनेत लाभार्थीचा आर्थिक सहभाग असणे आवश्यक असल्याने अर्थसहाय्य देतांना अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.

1. सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी त्र 85ः अनुदानाची मर्यादा,
2. आदिम जमातीचे लाभार्थी त्र95ः अनुदानाची मर्यादा,
3. जेथे सहाय्य 2000 पेक्षा कमी व त्र 100ः अनुदानाची मर्यादा,

लाभधारक दारिद्रय रेषेखालील.

**ब) प्रशिक्षणाची योजनाः**

या गटामध्ये आदिवासी व्यक्तींना रोजगार मिळविण्यासाठी किंवा नोकरी मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होतील अशा प्रशिक्षणाच्या योजना घेण्यात येत असतात. उदा.एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., वैद्यकीय पुर्वपरिक्षर, संगणक (कॉम्पुटर) प्रशिक्षण, वाहन चालक व वाहन प्रशिक्षण व्यवसायाभिमुख तांत्रिक प्रशिक्षण, पोलीसदल/लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण इत्यादीचा समावेश आहे.

**क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना :**

आदिवासींची गुणवत्ता आणि व्यक्तीमत्व विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत करुन त्यांना सुविद्य, सदृढ आणि समृध्द आणि नागरिक बनविणे हा या योजनेमागचा मुख्य उददेश असून त्यात महत्वाच्या क्रीडास्पर्धा, पारंपारीक कलाकृतीचे प्रदर्शन, नृत्यकलेचे जतन व संबर्धन, उदबोधक व ज्ञानसंबर्धन शिबीरे व मेळावे भरविणे, युवा आणि महिलांच्या रचनात्मक उपक्रमांना सहाय्य, सामूहिक विवाह अंतर्गत जोडप्यांना संसारउपयोगी वस्तूंचे सहाय्य इत्यादी प्रकारच्या योजना घेण्यात येत असतात.

**ड) आदिवासी कल्याण योजना :**

आदिवासी कास्तकारांचे अडीच पॉईट दरांचे विद्युतीकरण, महिला व बाल कल्याणासाठी अभिनव उपक्रम आदिवासीवरील आपत्कालीन किंवा अत्याचार प्रकरणी अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीने सहाय्य देणे इत्यादी योजनेचा समावेश होतो.

वर परिच्छेदे 4 मध्ये उल्लेख केलेल्या ब,क,ड यात देऊ केलेले अर्थसहाय्य 100ः अनुदान स्वरुपात देण्यात येते.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) अर्थसंकल्पना योजनेअंतर्गत कार्यक्रम/योजना मंजूरीचे अधिकार खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | लाभार्थी /योजना | क्माल मर्यादा | मंजूरी देणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | वैयक्तीक किंवा सामूहिक लाभाच्या योजना (प्रत्येकी 15000/– च्या अटीस अधिन राहून) | 7,50,000/– | अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखालील निर्देशन समिती |
| 2 | रुपये 7,50,000/–पेक्षा जास्त रकमेच्या सामुहिक योजना (प्रत्येकी 15000/– च्या अटीस अधिन राहून) | 30,00,000/– | आयुक्त, आदिवासी विकास |
| 3 | रुपये 30,00,000/–पेक्षा जास्त खर्चाच्या सामुहिक योजना (प्रत्येकी 15000/– च्या अटीस अधिन राहून) | ... | सचिव, आदिवासी विकास विभाग |

तसेच सन 2003–04 या आर्थिक वर्षात आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो–2003/प्र.क्र. 55/का.5, दिनांक 7 ऑगस्ट 2003 अन्वये या योजनेअंतर्गत तरतूद वाटप ही लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येऊन आदिवासी लाभार्थीचे निवड करतांना प्रकल्प क्षेत्रातील अदिम जमातीच्या लोकसंख्येनुसार योजनांचा लाभ देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. आदिवासी विकास विभागामार्फत मागासवर्गीय कल्याण योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना अत्यंत महत्वाच्या योजना आहेत.

4) कल्याण योजनेअतर्गत इतर योजनाः

अ) राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना :

राज्यातील अनुसूचित जमातीमध्ये विविध धर्माच्या लोकांच्या समावेश होता. या लोकांमध्ये भिन्न विवाह पध्दती दिसून येतात. लग्न समारंभाच्या निमित्ताने मोठया प्रमाणावर होणार खर्च कमी करण्यासाठी आणि विवाह सोहळयातील अनुसूचित प्रथांना आळा घालण्यासाठी सामुहिक सोहळयांना प्रोत्साहन देऊन अशा विवाह सोहळयामंध्ये सहभागी होणाऱ्या दांपत्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी कन्यादान योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यांचा धोरणात्मक निर्णय आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. सावियो –2003/प्र.क्र.179/का –8, दिनांक 3 मार्च 2004 अन्वये सन 2003– 2004 या वर्षापासून अंमलबजावणीसाठी झालेली आहे.

1) सदरची योजना ही स्वयंसेवी संस्था व संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत राबविण्यात येते.

2) प्रत्येक विवाह सोहळयाच्या आयोजनासाठी किमान 10 दांपत्ये असणे आवश्यक आहे.

3)सदरची योजना ही आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नाशिक/ धुळे/ नंदूरबार/जळगांव/अहमदनगर/ठाणे/रायगड/पुणे/अमरावती/ यवतमाळ/नांदेड/नागपूर/चंद्रपूर/गोंदीया आणि गडचिरोली या जिल्हयातंर्गत राबविण्यात येत आहे.

4) शासन शुध्दीपत्र क्र. सावियो–2003/प्र.क्र.179/का–8, दि. 18 फेब्रुवारी 2009 अन्वये सामुहिक विवाह सोळयामाध्ये सहभागी होणाऱ्या अनुसूचित जमातीच्या जोडप्यांना रु.10,000/– इतकी अनुदानाची रक्कम वधु–वरांचे नांवे अधोरेखीत धनादेश (क्रॉस चेक) किंवा पे–ऑर्डरने लग्नाच्या दिवशी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

5) शासन निर्णय क्र. सावियो–2009/ प्र.क्र.102/का–8, दि. 25 नोव्हेंबर 2009 अन्वये नवदांम्पत्यापैकी एकजण म्हणजेच वर किंवा वधु अनूसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे.

6) तसेच वर आणि वधुचे वय विवाहाच्या दिनांकास 35 वर्षापेक्षा जास्त असू नये. वधु व वराचा प्रथम विवाह असणे आवश्यक आहे. तसेच विवाहपूर्वी दोन अपत्ये झालेल्या दांम्पत्यास या योजनेचा लाभ मिळण्यासाठी 'संबधित जोडप्याने लग्न केले नाही परंतु ते एकत्र राहिले आहेत त्याला समाज मान्यता आहे', असा दाखला योजनेचा लाभ घेण्याऱ्या जोडप्याने संबंधित ग्रामपंचायतीकडून घेऊन लग्नाच्या सोहळयापुर्वी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे सादर करावा. सदर अटी व शर्ती नुसार प्रकल्प कार्यालयामार्फत पात्र जोडप्यांना योजनेचा लाभ दिला जातो.

ब) भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना

दारिद्रय रेषेखालील भूमिहीन शेतमजुर कुटूंबाना उदरनिर्वाहाचे अन्य साधन नसल्यामुळे त्यांना रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तिकडे मजूरी करावी लागते. परिणामी त्यांच्या राहणीमानावर प्रतिकुल परिणाम होतो. त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे व त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा याकरिता मजुरीवर असलेले अवलंबित्व कमी होऊन कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन आवश्यक आहे त्याकरिता आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. भूवाये–2003/प्र.क्र. 142/का–9, दिनांक 24 फेब्रुवारी 2004 च्या अन्वये आदिवासींना जमिन उपलब्ध करण्यात येवुन त्यासाठी 50 टक्के अनुदान व 50 टक्के कर्ज या स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन योजनेला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

शासन शुध्दीपत्रक क्र. भूवयो–2003/प्र.क्र.142/का–9, मंत्रालय मुंबई– 32, दि. 25 नोव्हेंबर 2005 अन्वये भूमिहीन आदिवासींना जी जमीन वाटप करावयाची आहे त्या जमिनीचे दर निश्चित करणे तसेच लाभार्थ्यांची निवड

करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**उक्त योजना खालील अटी व शर्तीनुसार राबविण्याचे धोरण आहे.**

1. दि. 1.1.2000 या दिनांकास भूमिहीन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र आहे.
2. जमिन पती–पत्नी यांच्या नांवे केली जाईल. विधवा व परितक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमीन त्यांच्या नावे केली जाईल.
3. प्रत्येक भूमिहीन कुटूंबास 4 एकर कोरडवाहू किंवा 2 एकर ओलिताखाली जास्तीताजास्त 20 गुंठेपर्यंत जमीन उपलब्ध करुन दिली जाईल व पोटखराबा जमीनसुध्दा लाभार्थ्यांना देण्यात यावी.
4. जमीन उपलब्ध करण्यासाठी संबंधित भागातील मागील 3 वर्षाएवजी पाच वर्षाचे खरेदी विक्री व्यवहार व प्रचलित शीघ्रसिध्द गणकाचे दर विचारात घेतले जातील. जमीन विक्रीस संबंधित व्यक्ती तयार नसेल तर तो दर जास्त त्यामध्ये 20 टक्केपर्यंत अधिक वाढ करण्याच अधिकार खरेदी समितीला राहतील.
5. 50 टक्के बिनव्याजी कर्ज व 50 टक्के अनुदान असे या योजनेचे स्वरुप असून कर्जाचा भाग राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.
6. लाभार्थ्यांचे किमान वय 25 व कमाल वय 60 इतके राहील.
7. आदिम जमाती, विधवा स्त्रिया व परितक्त्या यांना प्रथम प्राधान्य.
8. महसूल व वन विभागाने गायरान व अतिरिक्त जमिनीचे वाटप केले आहे त्या कुटूंबाना योजनेचा लाभ मिळणार नाही.
9. ज्या आदिवासी व्यक्तींच्या विरुध्द जमिनीची अतिक्रमणाबाबतची प्रकरणे महसूल अधिकाऱ्याकडे प्रलंबित आहेत त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.
10. जमिनीची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही
11. जमीन खरेदीसाठी लागणारी नोंदणी फी, नक्कल फी, पृष्ठांकन नक्कल, रुजावात व छायात्रित, मोजमाप व इतर येणारा आकस्मित खर्च यासाठी खर्च उपलब्ध निधीतून करण्यात येईल.

**क) ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम**

आदिवासी उपयोजना बाह्य भागामध्ये ज्या ठिकाणी मोठया संख्येने आदिवसींचे वास्तव्य आहे, तेथे शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून तरतुद करुन देण्यास प्रतिबंध आहे. यामुळे अशा भागांचा विकास इतर भागांच्या तुलनेने कमी प्रमाणांत होत आहे किंवा अशा वस्त्या दुर्लक्षित राहिल्या आहेत. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील ज्या वस्त्यांमध्ये/गावांमध्ये 50 टक्केच्या आसपास आदिवासी लोकसंख्या आहे. परंतु त्याचा माडा/ मिनीमाडा पॉकेटमध्ये समावेश झालेला नाही. अशा गावांचा मुलभूत सुविधांसाठी शासनाने विधी व सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यांत येणाऱ्या दलित वस्ती कार्यक्रमांच्या धर्तीवर आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक टिएसपी–2004/प्र.क्र.23/का–14, दिनांक 3 जून 2004 अन्वये शासनाने ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम या योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

तदनंतर शासन निर्णय क्र. आवसु–2006/प्र.क्र.72/का–14, दि. 26 जून 2007 च्या अन्वये ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारित कार्यक्रम म्हणून यापुढील काळापासुन राज्यातील ग्रामीण/नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा/मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा/मिनीमाडा क्षेत्र, तसेच आदिवासी उपयोजन बाहय क्षेत्रातील 50 टक्के पेक्षा जास्त आदिवासींची लोसंख्या असलेल्या वस्त्या/पाडे/वाडया/ गावांच्या महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग, तेथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामुहिक विकासाच्या सुविधा पुरविण्याची योजना राबविण्याचे धोरण लागू झालेले आहे.

सदर योजने अंतर्गत वरील वस्तीत खालीलपैकी कोणत्याही दोन बाबींचा लाभ देय आहे.

1. मुख्य वस्तीपासून जोडररस्ते / सिमेंट कॉंक्रिट / डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते.
2. शाळेचे कंपांऊंड
3. पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे.
4. जुन्या विहिरींची दुरुस्ती.
5. बंद गटार बांधणे.
6. आदिवासी वस्तीचे विदयुतीकरण.
7. समाजमंदिर.
8. सार्वजनिक शौचालय.
9. स्मशानभूमी बांधकाम / नदीकाठ संरक्षण भिंत / घाट बांधकाम.
10. तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास.
11. ग्रामपंचायत कार्यालय, ग्राम सचिवालय इ. कामे घेण्याबाबत सुचविण्यात आले आहे.

त्याकरिता खालीलप्रमाणे अनुदान कमालमर्यादा निश्चित आहे.

| अ.क्र | लोकसंख्या तपशील | निधी उपलब्धता एका कामासाठी खर्चाचे अंदाज पत्रक (रु. लाखात) | छोन कामासाठी खर्चाचे अंदाज पत्रक (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| 01 | 499 पेक्षा कमी आदिवासी लोकसंख्या वस्ती / पाडे / वाडया / गांवे | 5.00 | 10.00 |
| 02 | 500 ते 999 पेक्षा कमी आदिवासी लोकसंख्या वस्ती / पाडे / वाडया / गांवे | 10.00 | 20.00 |
| 03 | 1000 पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या वस्ती / पाडे / वाडया / गांवे | 15.00 | 25.00 |

ड) वीजपंप / तेलपंप–

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा शेतविकास किफायतशीरपणे होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व उर्जेचा पुरेपुर उपयोग करुन त्याव्दारे जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणुन आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने त्यांना 100 टक्के अनुदानावर विजपंप / तेलपंप पुरविण्याची योजना शासनाकडून सन 1973–74 पासून राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक इएमपी–1093 / प्र.क्र.59 (95) / का– 20, दिनांक 2 जानेवारी 1996 आदिवासी शेतकऱ्यांना विजपंप / तेलपंप पुरवठा करण्याच्या योजनेसंदर्भात कार्यबल समिती (टास्कफोर्स कमिटी) गठीत करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष संबंधित तालुक्यातील आमदार असतात. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील तालुक्यांमध्ये सदरच्या योजनेची अंमलबजावणी प्रकल्पस्तरीय समितीमार्फत करण्यात येते.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी पातत्रेच्या अटी खालील प्रमाणे आहेत.**

1. राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्र यातील ज्या आदिवासी शेतकऱ्याकडे किमान 60 आर (दीड एकर) आणि कमाल 6 हेक्टर 40 आर (16 एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे असे आदिवासी शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.
2. आदिवासी शेतकऱ्यांना पंप मंजूर करतांना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहिर / नाल्यास कमीत कमी सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

3. आदिवासी लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्त्रोत असलेल्या नदीनाल्यास पुरेसे पाणी उपलब्ध आहे, याबाबत खालील यंत्रणेची परवानगी/दाखला आवश्यक आहे.

अ) नाल्याचे पाणी घ्यावयाचे असल्यास तहसीलदारांची परवानगी लागते.

ब) अधिसुचित नाला असल्यास पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते.

क) लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्त्रोत असलेल्या नदी व वर नमुद केलेल्या उदभावास पाण्याची उपलब्धता पुरेशी आहे या विषयी आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी विकास निरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी करुन दाखला द्यावा लागतो.

4. आदिवासी शेतकरी स्वतः आपली जमीन कसत असला पाहिजे व तसे त्यांने आपल्या अर्जात प्रतिज्ञेवर नमूद करावे लागते. ज्या आदिवासी शेतकऱ्यांची जमीन इतरांकडे कसायला देण्यात आली आहे अशा आदिवासी लाभार्थ्याला या योजनेचा लाभ मिळणार नाही.

5. 60 आर पेक्षा कमी जमीन ज्यांच्या नांवाने असेल अशा किंवा 3 लगतच्या जमिनधारकांना एकत्रित येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रिपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील.मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमीन 60 आर पेक्षा जास्त असली पाहिजे.

6. या योजनेखाली ज्या गावात शेतात विजपुरवठा केला जाऊ शकतो त्या गावच्या शेतकऱ्यास फक्त विजपंप पंरवला जातो व जेथे विज पुरवठा केला जात नाही अथवा नजीकच्या भविष्यकाळात (3 वर्षे ) केला जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरविण्यात येतो.

**इ) आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे**

आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांना 100 टक्के सवलतीवर विदयुतपंप/तेलपंप पुरविले जातात. अशा लाभधारकांना केंद्रवर्ती अर्थसंक्लप (न्युक्लिअस बजेट) योजना अंतर्गत पी.व्ही.सी.पाईपचा पुरवठा प्राथम्य क्रमाने केला जात असे. परंतु केंद्रवर्ती अर्थसंक्लप (न्युक्लिअस बजेट) योजना राबविण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन पी.व्ही.सी.पाईप पुरवठा अशी नवी योजना प्रस्तावित केली आहे. सदरील योजना प्रोयोगीक तत्वावर नाशिक, नंदूरबार, धुळे, ठाणे, अमरावती व गडचिरोली या सहा जिल्हयासाठी मंजूर केली होती.

या संदर्भात आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईप (आय.एस.आय.मार्क) पुरवठा करणे या योजनेस शासन पत्र क्र. पी.व्ही.सी.2008 /प्र.क्र.266/का–5, दि.24 डिसेंबर 2008 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

एका लाभार्थीस 6 मीटर लांबीचे एच.डी.पी.ई. पाईप 210 मीटर लांबीचे मर्यादेत तसेच रु. 15000/–चे कमाल आर्थिक मर्यादेत मंजूर करावेत. आदिवासी शेतकरी हा स्वत जमीन कसत असला पाहिजे.

**निष्कर्ष**

आदिवासी विकास विभाग मार्फत मागसवर्गीय कल्याण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना अत्यंत महत्वपूर्ण योजना आहे. त्यामुळे आदिवासी समाजाच्या सर्वागीण विकास साध्य होण्यास मदत होत आहे.

**सदर्भ :**

1- अप्पर आयुक्त, आदिवासी विकास व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, महाराष्ट्र शासन, 'आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका', आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई, 4000032, पृष्ठ क्र : 13, 14, 15, 38, 39, 40, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52

2. गोंविद गारे, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे.30 , पृष्ठ क्र 42